RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १४] शुक्रवार, एप्रिल २४, २०१५/वैशाख ४, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.—**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . . . . . . | पृष्ठे १-३ |

दिनांक २२ एप्रिल २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. सईद,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २४ एप्रिल २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम).

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६६ चा महा. ४१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात, यापुढे, ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४४अ मध्ये,— १९६६ चा महा. ४१.

(एक) पोट-कलम (१) मध्ये,—

(क) खंड (तीन) मध्ये, " विशेष वसाहत प्रकल्पासाठी " या मजकुराऐवजी " एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) शर्त (ब) मध्ये, " विशेष वसाहत प्रकल्प " या मजकुराऐवजी " एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्प " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) शर्त (घ) मध्ये, " विशेष वसाहत प्रकल्प " या मजकुराऐवजी " एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्प " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (२) मध्ये, " विशेष वसाहत प्रकल्पासाठी " या मजकुराऐवजी " एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) पोट-कलम (५) मध्ये,—

(क) "विशेष वसाहत प्रकल्पासंबंधीची" या मजकुराऐवजी "एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पासंबंधीची" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " त्या जमिनीच्या धारकास विहित नमुन्यात सनद देण्यात येईल " या मजकुरापूर्वी, " अशी सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापराच्या बाबतीत साठ दिवसांच्या आणि एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या बाबतीत, नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत ", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(चार) स्पष्टीकरण-दोन ऐवजी पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण-दोन**.— या कलमाच्या प्रयोजनांसाठी, "एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्प" याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींअन्वये, शासनाने एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासासाठी तयार केलेल्या विनियमांखालील एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्प किंवा अनेक एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्प, असा आहे.". १९६६ चा महा. ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२८ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ३२८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (सोळा-क) मध्ये, " विशेष वसाहत प्रकल्पासाठी वापर " या मजकुराऐवजी " एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पासाठी वापर " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**४.** या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, उक्त संहितेच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.